उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216
ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

पत्र

विषयः- वन जमिन रायगड
पाण्याची पाईप लाईन टाकणेसाठी
वनजमिन मागणी प्रस्ताव वडघर ते
कळंबोली क्षेत्र 0.4005 हेक्टर

जावक क्र. ब/20/जमिन/ 5522 /2017-18.
अलिबाग-402 201, दिनांकः 13 /03/2018.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
(पापु-2) सिडको लि. 5 वा मजला,
रायगड भवन, सिबीडी बेलापूर,
नवी मुंबई- 400 614.

Put up proposal for approval for aforestation charges to be paid & F.D.
16/03
AEE(D)

संदर्भः- शासन निर्णय क्र.एफएलडी-1318/प्र.क्र.23/फ-10, दिनांक 14/02/2018.

वडधर ते कळंबोली पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठी वनक्षेत्र 0.4005 हेक्टर मागणी प्रस्तावांस राज्य शासनाने तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. विषयांकीत प्रस्तावांस संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्य शसनाकडून काही अटी व शर्तीवर तत्वतः मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडून पाठविण्यात येत आहे.

तरी खालील प्रमाणे अटींची पूर्तता करणेत यावी.

<u>अट क्र. 1</u> - नुसार वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलता येणार नाही.

<u>अट क्र. 2</u> – नुसार 1.00 हेक्टर अवनत वनक्षेत्रांवर वनीकरण करणेकरीता आवश्यक असणारी रक्कम रु. 5,46,176/- (सदर रक्कम ही सन 2018-19 या वर्षातील रेडी रेक्नरचे दराप्रमाणे कळविण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावास अंतिम मंजुरी मिळणेस कालावधी लागल्यास पुढील आर्थिक वर्षात पर्यायी वनीकरण योजना राबवावी लागेल अशा परिस्थितीत पुढील आर्थिक वर्षाचे रेडी रेक्नरचे दर लागू होतील व फरकाची रक्कम भरावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी) एवढे रकमेचा भरणा करावा.

<u>अट क्र. 3</u> - ज्या कारणासाठी वनजमीन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

EE (Kondhane)
Inword No. 126
Date : 16/03/18

E:\LAND 3\2012-2013\FCACT\CIDCO NH4B Vadghar to Kalamboli.doc

**अट क्र. 4** – सदर अटी नुसार नक्त वर्तमान मुल्य दर रक्कम रु. 9,39,000/- प्रति हेक्टर प्रमाणे वळतेकरण होणारे वनक्षेत्र 0.4005 हे. साठी रक्कम रु. 3,76,070/- एवढी भरणा करावी.

**अट क्र. 5** – सदर अटी नुसार कैंद्रशासनाचे सुधारीत सुचनांनुसार सुधारीत दराने नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरण्यास तयार असलेबाबतचे हमीपत्र देण्यात यावे. तसेच सुधारीत दराने आवश्यकतेनुसार अधिकची रक्कम भरणा करावी लागेल.

**अट क्र. 6** – सदर अटी नुसार कांदळवन क्षेत्रावर प्रकल्पाचे काम करणेसाठी जन हित याचिका क्र. 87/2006 मधील मा. उच्च न्यायालयाचे दिनांक 27/1/2010 नुसार मा. हरित न्यायाधीकरण / मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची परवानगी घेऊन ती पुर्तता अहवालसमवेत या कार्यालयास सादर करावी.

**अट क्र. 7** - सदर अटीनुसार आवश्यकता असल्यास पर्यावरणीय मंजुरी प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

**अट क्र. 8** – प्रकल्पास लागू असणा-या सर्व संबंधीत कायदयांतील तरतुदी, नियम व मार्गदर्शक सुयाना यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

**अट क्र. 9** – जमिनीच्या प्र.चलित कायदयांनुसार प्रकल्पासाठी लागणारी सर्व आवश्यक मंजुरी वैधानिक मान्यतेपुर्वी प्राप्त करुन घेणे आपणावर बंधनकारक राहील.

**अट क्र. 10** – शासन मान्यता पत्रामध्ये नमूद कैंद्रशासनाचे पत्रातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याची जबाबदारी ही आपली राहणार आहे याची नोंद घ्यावी..

**अट क्र. 11** – वन विभागाने घातलेल्या सर्व अटी आपणावर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

**अट क्र. 12** – मुख्य वनसंरक्षक ठाणे यांचे परवानगीशिवाय वनक्षेत्रामध्ये कामे सुरु करता येणार नाहीत.

**अट क्र. 13** – सदर प्रस्तावांत मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून घालणेत येणा-या अटींची पूर्तता करणे हे प्रकल्प यंत्रणेवर बंधन कारक राहील.

**अट क्र. 14** – मंजुरी पत्रातील वरील प्रमाणे अटींची पूर्तता झालेनंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमीन वळतीकरणास अंतिम मंजुरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे हे प्रत्यक्षांत वनजमीन वळतीकरणाची कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी.

वरील प्रमाणे पर्यायी वनीकरण योजना व नक्त वर्तमान मुल्य या रकमेचा भरणा www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावरुन लॉग ईन लॉईन करुन चलन जनरेट करुन भरणा करता येईल. भरणा केलेल्या चलनाची प्रत व अट निहाय पुर्तता अहवाल आवश्यक हमीपत्रांसह (Undertakings) **सहा प्रतीत** या कार्यालयास सादर करावा ही विनंती. उक्त अटींची पूर्तता केलेनंतर राज्य शासनाकडून अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल व त्यानंतरच शासनाचे सुचनांप्रमाणे प्रत्यक्ष जमिन वळतीकरणाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपणाकडून सदर तत्वतः मंजूरी पत्रांतील अटीची पूर्तता केलेनंतर याबाबतचा पुर्तता अहवाल शासनास सादर करणे शक्य होईल.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व परिक्षेत्र वन अधिकारी, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

E:\LAND 3\2012-2013\FCACT\CIDCO NH4B Vadghar to Kalamboli.doc